Department of Agriculture

Government of Maharashtra

The World Bank assisted

# Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प



# शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा अंदाज अहवाल

## (जून २०२५ साठी)


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष –कृषी


**(मे, २०२५)**

## बाजार माहिती आणि जोखीम निवारण कक्ष — मे - २०२५


**मका** हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश्या तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो.भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२४-२५ मध्ये, जगात मागील वर्षांच्या तुलनेत ०.६ टक्के मक्याचे उत्पादन घट होण्याच्या अंदाज आहे.




अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२३-२४ मध्ये, भारतात मागील वर्षांच्या तुलनेत १.५ टक्के मक्याचे उत्पादनात घट होण्याच्या अंदाज आहे. तसेच सन २०२३-२४ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये मक्याचे उत्पादनात ०.९० टक्के वाढ होण्याचा असा अंदाज आहे.





केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार राज्यात सन २०२४-२५ मध्ये एकूण मक्याचे उत्पादन मागील वर्षीच्या (२०२३-२४) तुलनेत ७४.१२ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार मक्याची निर्यात २०२४-२५ मध्ये ६ लाख मेट्रिक टन होण्याचा अंदाज आहे, जी २०२३-२४ च्या तुलनेत २५% घट होईल असा अंदाज आहे.

देशांतर्गत किंमती वाढल्यामुळे आणि पिक कमी झाल्यामुळे २०२३-२४ या कालावधीत भारताची मका निर्यात चार वर्षांच्या निचांकी पातळीवर घसरली. इथेनॉल, कुक्कुटपालन आणि स्टार्च उत्पादकांकडून वाढलेल्या मागणीमुळेही निर्यातीत घट झाली.




देशात चालू वर्षीच्या एप्रिल २०२५ मध्ये मक्याची आवक मागील वर्षीच्या एप्रिल २०२४ च्या तुलनेत ८८.६४ टक्क्यांनी वाढली आहे.




* माहे मे, २०२५ ची किंमत दि. २० मे पर्यंतची आहे.

मागील तीन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या जून महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.


जून २०२२ - रुपये २१८६ प्रति क्विंटल
जून २०२३ - रुपये १८९३ प्रति क्विंटल
जून २०२४ - रुपये २३५० प्रति क्विंटल

खरीप हंगाम २०२४-२५ साठी मका पिकाची किमान आधारभूत किंमत (MSP) रु. २२२५ प्रति क्विंटल इतकी जाहीर करण्यात आलेली आहे.

**जून २०२५ महिन्यासाठी मक्याचे नांदगाव बाजारातील किंमत अंदाज पुढील प्रमाणे :**
**रुपये २००० ते २४०० प्रति क्विंटल.**


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष मे २०२५

**हरभरा:** हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरूपात केला जातो.





हरभरा हे रब्बी पिक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२४-२५ मध्ये हरभऱ्याचे उत्पादन सुमारे ११५.४० लाख टन होण्याची शक्यता आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसून येते.


महाराष्ट्रातील २०२३-२४ मधील उत्पादन २६.९० लाख टनांवरून सन २०२४-२५ मध्ये २८.२ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.




मागील वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये आयात वाढलेली आहे तर निर्यात कमी झालेली आहे




मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष मे २०२४-२५ (२२ मे २०२५ पर्यंत) मधील हरभऱ्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी झालेली दिसून येत आहे. मे २०२५ मध्ये ती २.० लाख टन इतकि आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत २.५ लाख टन इतकी होती.




ऑक्टोबर २०२४ पासून हरभऱ्याच्या किंमती कमी होत आहेत. सध्याच्या किंमती भारत सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.

मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील हरभऱ्याच्या जून मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| जून २०२२: | रु. ४,५८९/क्विंटल |
| जून २०२३: | रु. ४,८७८/क्विंटल |
| जून २०२४: | रु. ६,५७५/क्विंटल |

रब्बी हंगाम २०२४-२५ साठी हरभऱ्याची सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत रु. ५,६५०/क्विंटल इतकी आहे.


## लातूर बाजारातील संभाव्य किंमती


### जून २०२५: रु. ५,५०० ते ६,०००/क्विं

सदर संभाव्य अंदाज हा FAQ ग्रेड च्या हरभऱ्यासाठी आहे

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष — मे २०२५


**तूर:** भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे.





माहे डिसेंबर ते एप्रिल हा तुरीचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष मे (२२ मे २०२५) मधील तुरीची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी राहिलेली दिसून येत आहे. मे २०२५ मध्ये ६.३ लाख टन आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत ९.१ लाख टन होती.

तूर हे खरीप पिक असून त्याची पेरणी जून ते जुलै व काढणी डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२४-२५ मध्ये तुरीचे उत्पादन सुमारे ३५.०२ लाख टन होण्याची शक्यता आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसून येत आहे. तसेच महाराष्ट्रातील २०२३-२४ मधील उत्पादन १०.१० लाख टनांवरून सन २०२४-२५ मध्ये १२.६० लाख टनांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.




नोव्हेंबर २०२४ पासून तुरीच्या किंमती कमी होत आहेत. गतवर्षीच्या दरापेक्षा चालू वर्षी तुरीचे भाव कमी आहेत.मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील तुरीच्या जून मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| जून २०२२: | रु. ६,२९३/क्विंटल |
| जून २०२३: | रु. १०,०८२/क्विंटल |
| जून २०२४: | रु.११,१८९/क्विंटल |

सध्याच्या हंगामासाठी सरकारने खरीप २०२४-२५ साठी जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (रु.७५५०/क्विंटल) सध्याच्या तुरीच्या किंमती कमी आहेत.

मागील वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये आयात कमी झालेली आहे तर निर्यात वाढलेली आहे


## लातूर बाजारातील संभाव्य किंमती

**जून २०२५: ६,८०० ते ७,६०० /क्विं**


सदर संभाव्य अंदाज हा FAQ ग्रेड च्या तुरीसाठी आहे

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष — मे २०२५


**सोयाबीन:** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकन कृषी विभागाच्या, (USDA, मे. २०२५) अहवालानुसार सन २०२५-२६ मध्ये, जगात ४२६८ लाख टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत १.४ टक्कनी ( लाख टन, २०२३-२४) अधिक आहे.





भारतात सन २०२५-२६ मध्ये सोयाबीनचे उत्पादन १२५ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत १ टक्कनी कमी आहे. ( स्त्रोत: USDA, मे २०२५)





सन २०२४-२५ मध्ये सोयामीलच्या निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली आहे. सन २०२३-२०२४ मध्ये १९.७ लाख टन सोयापेंड निर्यात झाली आहे. **सन २०२४-२५ मध्ये** निर्यात ११ लाख टन असून ती मागील वर्षाच्या तुलनेत कमी आहे. ( **स्त्रोत:** USDA, **मे २०२५**)




सन २०२३-२४ च्या तुलनेत सन २०२४- २५ मध्ये सोयाबीन तेलाच्या आयातीत **तुलनेत ५४ टक्केनी** वाढ आहे. ( **स्त्रोत:** USDA, **मे २०२५**)




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनची मासिक आवक कमी दिसून येते. ( **स्त्रोत:** Agmarknet)




सन २०२४-२५ हंगामासाठी किमान आधारभूत किंमत रु. ४८९२ प्रती क्विंटल आहे. मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनच्या किंमती कमी आहेत ( स्त्रोत: Agmarknet).
मागील तीन वर्षातील जुन महिन्यातील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:


जुन २०२२: रु.६५५६ प्रती क्विंटल.
जुन २०२३: रु. ४९७९ प्रती क्विंटल.
जुन २०२४: रु. ४५३९ प्रती क्विंटल.

## लातूर बाजारातील संभाव्य किंमती –
## जुन २०२५ : रु. ४२०० ते ४६०० प्रती क्विंटल


सदर संभाव्य किंमत अंदाज हा FAQ ग्रेडच्या सोयाबीनसाठी आहे.

## बाजार माहिती आणि जोखीम निवारण कक्ष — मे - २०२५


**कापूस** हे भारतातील सर्वात महत्त्वाचे व्यावसायिक पीक आहे, जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी २५% वाटा भारताचा आहे.





२०२४-२५ मध्ये जागतिक उत्पादन १२०२ लक्ष गाठीपर्यंत घटण्याचा अंदाज आहे. एकूणच, गेल्या महिन्यात आर्थिक दृष्टीकोन सुधारला असूनही २०२४-२५ विपणन वर्षासाठी जागतिक कापसाच्या मागणीचा दृष्टीकोन काहीसा नकारात्मक आहे.





USDA-FAS च्या अंदाजानुसार विपणन वर्ष २०२४-२५ मध्ये भारतातील कापूस उत्पादन २५.४ दशलक्ष ४८० lb bales आहे., शेतकरी कापूस लागवडीचे क्षेत्र डाळी, मका आणि भात यासारख्या उच्च परतावा पिकांकडे वळवतील या अपेक्षेमुळे पेरणी केलेल्या १२.४ दशलक्ष हेक्टर क्षेत्रावरील गाठी मागील वर्षाच्या तुलनेत दोन टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. (स्रोत:USDA-Cotton Outlook)





केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार राज्यात सन २०२४-२५ मध्ये एकूण कापसाचे उत्पादन मागील वर्षीच्या (२०२३-२४) तुलनेत १०.७३ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज आहे.




राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत, मागील वर्षाच्या तुलनेत २०२३-२४ मध्ये आयातीत आणि निर्यातीत वाढ होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक पातळीवर दिसला असून मागील वर्षीच्या तुलनेत आयात व निर्यातीमध्ये सरासरी ६% वाढ झाली आहे.




देशात चालू वर्षीच्या एप्रिल २०२५ मध्ये कापसाची आवक मागील वर्षीच्या एप्रिल २०२४ च्या तुलनेत ७.७२ टक्क्यांनी वाढली आहे.




* माहे मे, २०२५ ची किंमत दि. २० मे पर्यंतची आहे.

मागील तीन वर्षातील राजकोट बाजारातील कापसाच्या जून महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

जून २०२२ - रुपये ११५७१ प्रति क्विंटल
जून २०२३ - रुपये ७२८५ प्रति क्विंटल
जून २०२४ - रुपये ७२९० प्रति क्विंटल

खरीप हंगाम २०२४-२५ साठी मध्यम धाग्याच्या कापूस पिकाची किमान आधारभूत किंमत (MSP) रु. ७१२१ प्रति क्विंटल इतकी जाहीर करण्यात

**जून २०२५ या कालावधीसाठी कापसाच्या किमती अंदाजे रु. ७,२०० ते ७,८०० प्रति क्विंटल राहतील.**

टीप: *सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा*

हा QR कोड स्कॅन करून व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा

लिंक – https://shorturl.at/jOYAM

---


अधिक माहितीसाठी

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,

सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे- ४११०१६

फोन : **020-25656577**, टोल फ्री क्रमांक: **1800-210-1770**

ई-मेल : market.intelligence.smart@gmail.com

वेबसाईट : smart-mh.org